सकाळ

• सातारा, शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२०

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# खाद्यपदार्थ, वस्तूंच्या स्टॉलला प्रतिसाद

## कोरेगावात डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचा खाद्य महोत्सव



कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयातील 'ट्रेड फेअर डे' महोत्सवात सहभागी झालेले विद्यार्थी.

**कोरेगाव, ता. ६ :** विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक सक्षमता, ग्राहक संबंध, विक्री-संवादकौशल्य व उद्योजकता निर्माण व्हावी, या हेतूने येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजिलेल्या 'ट्रेड फेअर डे' महोत्सवास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या महोत्सवाचे उद्‌घाटन मॉर्डन इंग्लिश ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य एस. टी. चव्हाण, कात्रेश्वर हायस्कूलचे मुख्याध्यापक डी. ए. लोहार आदींच्या हस्ते व प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. महोत्सवात विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थ व विविध वस्तूंच्या विक्रीचे ४० स्टॉल उभारले होते.

त्यात महाराष्ट्रीयन, पंजाबी, गुजराती, मालवणी, राजस्थानी आदींसह विविध प्रांतीय खाद्यपदार्थांचा समावेश होता. या महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्राचार्य डॉ. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक प्रा. डी. डी. पाटील, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. एस. एस. पवार, कनिष्ठ वाणिज्य विभागप्रमुख प्रा. बी. एस. गायकवाड आदींसह विभागातील सहकारी प्राध्यापकांनी महोत्सवाचे आयोजन केले. याकामी उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव, डॉ. विजय वाडते, प्रा. श्रीमंत शिंदे, प्रा. सी. बी. जावळे, प्रा. एस. एन. कोळेकर, प्रा. बी. डी. भोसले, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.